Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar 431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation
कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५-२६/1128 दिनांक : १७.१२.२०२५

**अत्यंत तात्काळ**

**प्रति,**
**विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक,**
**सर्व शैक्षणिक विभाग/संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

विषय : सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ : १) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. सहसं/उशि/छसं/महाडीबीटी/२०२५-२६/२८२९, दि. २४.११.२०२५ रोजीचे पत्र
२) याकार्यालयचे पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०२५-२६/१०९२, दि. २८.११.२०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी दि. २४.११.२०२५ रोजी पत्रान्वये सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या अनुषंगाने विहित करुन दिल्याप्रमाणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलंग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र विद्यार्थ्याच्या माहितीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत अनेक महाविद्यालय/परिसंस्थांनी प्रस्ताव सादर केलेले नाही.

**त्यानुसार पुनःश्च सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र. ०१ मध्ये नमूद केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र विद्यार्थ्यीची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात यावी.**

**१. नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ सत्राकरिता विवरणपत्र-१ मध्ये सविस्तर माहिती भरून पाठवावी.**

**२. मार्च/एप्रिल, २०२६ सत्राकरिता विवरणपत्र-२ मध्ये सविस्तर माहिती भरून पाठवावी.**

**ज्या विद्यार्थ्यांनी नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ या सत्राचे परीक्षा आवेदन पत्र भरलेले आहेत व मार्च/एप्रिल, २०२६ यासत्राचे परीक्षा आवेदन भरणार आहे व संदर्भिय पत्रानुसार परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहे. अशा**

सर्व पात्र विद्यार्थ्यांची माहिती विवरणपत्र-१ व विवरणपत्र-२ अन्वये **Microsoft Excel 2007** अंतर्गत **Times New Roman Font** मध्ये तयार करुन सोमवार, दि. २२.१२.२०२५ रोजीच्या आत **coordination.exam@bamu.ac.in** ईमेल वर पाठवुन त्याची एक प्रत विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन बुधवार, दि. २४.१२.२०२५ रोजीच्या आत समन्वय कक्ष, परीक्षा विभाग, विद्यापीठ परिसर यांना शैक्षणिक विभाग/महाविद्यालय/परिसंस्थातील प्रतिनिधी मार्फत पाठविण्यात यावी.

**तसेच वर नमूद केलेल्या तारखेच्या आत अतिवृष्टी व पूर घोषित तालुक्यातील पात्र विद्यार्थीची माहिती सादर न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शैक्षणिक विभागाचे प्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांची राहील. याची नोंद घ्यावी.**

कोणत्याही परिस्थितीत सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन अतिवृष्टी व पूर घोषित तालुक्यातील पात्र विद्यार्थीची माहिती सादर करण्यात यावी.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या bamu.ac.in and http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर | : | **प्रा. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे** |
| संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२५-२६/1128 | : | **संचालक,** |
| दिनांक : १७.१२.२०२५ | : | **परीक्षा व मूल्यमापन मंडळ** |

**यापत्राची प्रतः मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव अग्रेषित.**

Annexure-I

# DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

## REFUND EXAMINATION FEES OF NOV/DEC, 2025 EXAMINATIONS

**Name of College/Department:** ______________________________

| Sr. No. | Name of Student (Surname First) | Name of Course | Semester | Village/City | Taluka | District | Exam Fee (Only) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |
| 6 | | | | | | | |
| 7 | | | | | | | |
| 8 | | | | | | | |
| 9 | | | | | | | |
| 10 | | | | | | | |
| 11 | | | | | | | |
| 12 | | | | | | | |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *

Seal & Sing
Principal/Head

## DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

### REFUND EXAMINATION FEES OF MARCH/APRIL, 2026 EXAMINATIONS

**Name of College/Department:** ____________________

| Sr. No. | Name of Student (Surname First) | Name of Course | Semester | Village/City | Taluka | District | Exam Fee (Only) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |
| 6 | | | | | | | |
| 7 | | | | | | | |
| 8 | | | | | | | |
| 9 | | | | | | | |
| 10 | | | | | | | |
| 11 | | | | | | | |
| 12 | | | | | | | |

Seal & Sing
Principal/Heads

शैक्षणिक विभाग/महाविद्यालयाचे लेटर हेड

विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांचे नाव :

भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :

ई-मेल आयडी :

संदर्भ क्र.: दि. / /२०२५

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लक्ष मर्यादेपर्यत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी पुरग्रस्त भागातील एकुण विद्यार्थी संख्या ............... व रक्कम रु. ......................... एवढी आहे

करिता, प्रमाणित करण्यात येत आहे.

प्राचार्य/विभाग प्रमुख
नाव
शिक्का

*Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University *Chhatrapati Sambhajinagar*

# -DEPARTMENT/COLLEGE LETTER HEAD-

## NO. OF STUDENTS & FEES SUMMERY SHEET

### REFUND EXAMINATION FEES OF NOV/DEC, 2025 EXAMINATIONS

| Sr. No. | Name of Examination | Semester | No. of Students | Total Examination Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |
| 7 | | | | |
| 8 | | | | |
| 9 | | | | |
| 10 | | | | |
| 11 | | | | |
| 12 | | | | |
| 13 | | | | |
| 14 | | | | |
| 15 | | | | |
| | | Grand Total | | |

### REFUND EXAMINATION FEES OF MARCH/APRIL, 2026 EXAMINATIONS

| Sr. No. | Name of Examination | Semester | No. of Students | Total Examination Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |
| 7 | | | | |
| 8 | | | | |
| 9 | | | | |
| 10 | | | | |
| 11 | | | | |
| 12 | | | | |
| 13 | | | | |
| 14 | | | | |
| 15 | | | | |
| | | Grand Total | | |

Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar
Accredited by NAAC "A" Grade

Seal & Sing
Principal/Head

महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, उच्च शिक्षण, छ.संभाजीनगर विभाग, छ.संभाजीनगर**
**देवगिरी महाविद्यालया जवळ, रेल्वे स्टेशन रोड (नवीन इमारत), छ.संभाजीनगर ४३१००१**
Website: www.jdheauragngabad Email- schol.jdheaur@gmail.com / jdheaur_2007@rediffmail.com
फोन नं ०२४०- २३३१९१३ फॅक्स ०२४०-२३३१९१३

जा.क्र.सहसं/उशि/छसं/महाडीबीटी/२०२५-२६/ 2829 दि.:-२४/११/२०२५

**तात्काळ/महत्वाचे**

**प्रति,**
प्र-कुलगुरु,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,
छत्रपती संभाजीनगर.

विषय :- सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१८८/ई१३९२२२९ मशि-३ दि.०४/११/२०२५.
२. शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२५/प्र.क्र३६५/(मदत-१), दि.१०/१०/२०२५
३.संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-शिष्य/पुरग्रस्त/२०२५E-२३९२२०४ दि.२१/११/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयी मा.शिक्षण संचालनालयाचे संदर्भीय पत्र तसेच पत्रासोबतचे शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२५ आणि शासन पत्र दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या पत्राच्या प्रती जोडण्यात येत आहे. कृपया संचालनालयाकडील पत्र तसेच शासन निर्णय व शासन पत्राचे अवलोकन व्हावे.

शासन निर्णय १०/१०/२०२५ अन्वये राज्यातील विविध तालुक्यातील अतिवृष्टी झाल्यामुळे अशा तालुक्यांना आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहे.सदर तालुक्यांतील सर्व बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थिती लागू असणा-या सर्व सवलतींना मान्याता देण्यात आली आहे.या मध्ये विद्यार्थ्यांना परीक्ष शुल्क माफीची सवलत देण्यात आली आहे.

आपल्या विद्यापीठ अधिनस्त संबधित तालुक्यातील विदयार्थ्यांना परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करण्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून घेण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा आहे.शासन निर्णय १०/१०/२०२५ नुसार एकूण २८२ तालुके आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आलेले आहे.सदर आपत्तीग्रस्त/ बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थिती लागू असणा-या सर्व विद्यापीठ संलग्नीत अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांना परीक्षा फी सवलती देण्याबाबत.या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात आली आहे.खालील प्रमाणे प्रस्ताव कार्यालयास सादर करावे.

१. सद्यस्थितीत विद्यापीठाचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयांने त्यांचे महाविद्यालयात सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पुर घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करून संबंधित विभागीय सहसंचालक,यांचेकडे आवश्यक रकमेची मागणी करावी.

२. तसेच विद्यापीठाने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पुर घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करून विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय,छत्रपती संभाजीनगर या विभागीय कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar
Inward No. 2778
Exam Branch
Date 27/11/25

३. कोणत्याही परिस्थीतीत अतिवृष्टी व पुर घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विदयार्थी सदर योजनेपासून वंचित राहाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४. ज्या विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती मध्ये परिक्षा फी चा लाभ मिळतो ते विद्यार्थी वगळून इतर विद्यार्थ्यांची माहितीची सादर करावी.

तरी वरील दर्शविण्यात आलेल्या उपरोक्त मुदयांची माहिती तसेच पत्रासोबत जोडलेले अ विवरणपत्रामध्ये अचूक माहिती व त्याबाबतचे प्रमाणपत्र तात्काळ प्रस्तुत दिनांक २७/११/२०२५ पर्यंत कार्यालयास सादर करण्यात यावे.

**सोबत:विवरणपत्र,अ**

26/11/2025

**( डॉ.पंकजा माधव वाघमारे )**
**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**

प्रत :- १. मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. कुलसचिव, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
३. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कुलसचिव, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
Web-ww.dhepune.gov.in फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail : schol.dhepune@gov.in

क्र.उशिंस - शिष्य/ पुरग्रस्त/2025/E- 2392204 दि. /११/२०२५

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय - सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत. . . .**

संदर्भ:- १. शासन पत्र क्र.-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१८८/ई-१३९२२२९/मशि-३, दि. ०४/११/२०२५.
२. शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२५/प्र.क्र.३६५/म-३(मदत-१), दि.१०/ १०/२५.

शासन पत्र दि.०४/११/२०२५ आणि शासन निर्णय दि. १०.१०.२०२५ चे कृपया अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये शासनाने कळविले आहे की, शासन निर्णय दि. १०.१०.२०२५ अन्वये राज्यातील विविध तालुक्यांमध्ये **अतिवृष्टी** झाल्यामुळे अशा तालुक्यांना आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहे. सदर तालुक्यांतील सर्व बाधितांना **दुष्काळ सदृष्य परिस्थिती लागू असणा-या सर्व सवलतींना मान्यता देण्यात आली आहे. या मध्ये विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफीची सवलत देण्यात आली आहे.** शासन निर्णय दि. १८.१०.१९९३ अन्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठे, परीक्षा मंडळे व महाविद्यालयांची परीक्षा फी माफीची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत महसूल व वन विभागने दुष्काळ घोषित केल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फीची प्रतिपूर्ती कण्यात येते.

या योजनेसाठी अर्थसंकल्पात अत्यल्प तरतूद उपलब्ध असते. तथापि दुष्काळ जाहिर झाल्यानंतर सदर भागातील विद्यार्थ्यांची तसेच विविध विद्यापीठे व महाविदयालयांच्या फी ची रक्कम परिगणित करण्यात येऊन पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात येते. ही रक्कम संबंधित विद्यापीठे व महाविदयालये यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या फी ची प्रतिपूर्ती करण्यात येते.

त्यानुसार विभागाच्या अधिनस्त संबंधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करण्यासाठी आवश्यकतेनुसार पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त तरतुद उपलब्ध करून घेण्याकरिता पुरवणी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करणेस शासनाने कळविले आहे.

याबाबत कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक ११.१०.१९९३ नुसार, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. आता महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२५ नुसार, राज्यातील विविध तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी पूर्णत: अथवा अंशत: प्रभावित झालेले एकूण २८२ तालुके सोबतच्या सुधारित परिशिष्टानुसार आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. सदर तालुक्यातील सर्व आपदग्रस्त/बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्याबाबत या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार आपल्या विभागातील आपल्या अधिनस्त अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्या .

१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक ११.१०.१९९३ नुसार परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांन कडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक ११.१०.१९९३ या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे.

२. सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

३. तसेच विद्यापीठांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी .

४. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी महाविद्यालयांकडून / विद्यापीठांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र 'अ' मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी पुरक मागणी शासनाकडे सादर करून मंजूर झालेली तरतूद मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५. कोणत्याही परिस्थितीत अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६. मागणी नसल्यास तसे स्पष्ट अभिप्राय देण्यात यावेत.

उपरोक्त मुदयांची माहिती तसेच सोबत जोडलेल्या विवरणपत्रात व प्रमाणपत्रासह तात्काळ सादर करण्यात यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 21-11-2025 18:49:17

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - 16.

विवरणपत्र - अ

सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.(रक्कम रुपयात)

| अ. क्र. | सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२५-२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी

DHEPN-SCH1011/93/2025-SCHW1

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लक्ष मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी पुरग्रस्त भागातील ( विद्यार्थी संख्या---) व (रक्कम रु.---) एवढी आहे.

**स्वाक्षरी**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०००३२

दुरध्वनी क्र.०२२/२२७९३१७७
Email ID: mashi3-hted@mah.gov.in

---

**क्रमांक**- संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१८८/ई-१३९२२२९/मशि -३, **दिनांक:** ०४.११.२०२५

**तात्काळ**

प्रति ,

संचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय:-** पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्याबाबत.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. १०.१०.२०२५ अन्वये राज्यातील विविध तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे अशा तालुक्यांना आपत्तीग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर तालुक्यातील सर्व बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थिती लागू असणाऱ्या सर्व सवलतींना मान्यता देण्यात आलेली आहे. या मध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीची सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच, शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग दि. १८.१०.१९९३ अन्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठे, परीक्षा मंडळे व महाविद्यालयांची परीक्षा फी माफीची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत महसूल व वन विभागाने दुष्काळ घोषित केल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फीची प्रतिपूर्ती करण्यात येते. या योजनेसाठी अर्थसंकल्पात अत्यल्प तरतूद उपलब्ध असते. तथापि दुष्काळ जाहिर झाल्यानंतर सदर भागातील विद्यार्थ्यांची तसेच विविध विद्यापीठे व महाविद्यालयांच्या फी ची रक्कम परिगणित करण्यात येऊन पुरवणी मागणीव्दारे अतिरिक्त तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात येते. हि रक्कम संबधित विद्यापीठे, महाविद्यालये यांना अदा करण्यात येऊन संबधित विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या फी ची प्रतिपूर्ती करण्यात येते.

२. त्यानुसार विभागाच्या अधिनस्त संबधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करण्यासाठी आवश्यकतेनूसार पुरवणी मागणीव्दारे अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन घेण्याकरिता पुरवणी मागणी प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करावा.

(प्रदिप हासे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे सवलतीसाठी बाधित तालुके घोषित करणे बाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
शासन निर्णय, क्रमांक:- सीएलएस-२०२५ /प्र.क्र.३६५ /म-३ (मदत-१),
दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२५

**वाचा:**

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३ एप्रिल २०१५
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.०७ ऑक्टोबर, २०१७
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.२८ जून, २०१८
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: एससीवाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि.२८ ऑक्टोबर, २०२१
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०२५/प्र.क्र.३६५//म-७, दि.०९ ऑक्टोबर, २०२५

**प्रस्तावना:**

राज्यामध्ये सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन पूर आपत्ती परिस्थिती उद्भवलेली आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे शेती पिक/शेतजमीन यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून, पशुहानी, मनुष्यहानी होणे, घर पडझड होणे, पुरामुळे गावातील बाधितांना स्थलांतरीत करणे या बाबत मदत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत राज्यामध्ये पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असून त्यानुसार जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर क्षेत्राचे तर सप्टेंबर २०२५ या महिन्यात जवळ-जवळ ३९ लाख हेक्टर क्षेत्राचे असे राज्यामध्ये एकूण सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्राचे शेतीपिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे पूर्णत: अथवा अंशत: प्रभावित तालुके संदर्भ क्र.५ मधील शासन निर्णय दि. ९ ऑक्टोबर २०२५ मधील परिशिष्ट अ अन्वये घोषित करण्यात आले होते. या मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील विविध तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी पूर्णत: अथवा अंशत: प्रभावित झालेले तालुके सोबतच्या सुधारित परिशिष्टानुसार आपत्तीग्रस्त घोषित करण्यात येत आहेत. सदर तालुक्यातील सर्व आपदग्रस्त/ बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्याबाबत या शासन निर्णयाने मान्यता देण्यात येत आहे.

सदर सवलती पुढील प्रमाणे,

१. जमीन महसूलात सूट
२. सहकारी कर्जाचे पुनर्गठन
३. शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती (एक वर्षासाठी)
४. तिमाही वीज बिलात माफी
५. परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी.

सदर सवलतींबाबत संबंधित प्रशासकीय विभागाने अनुषंगिक कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१०१०२३५८२१९२१९ आदेश डिजीटली स्वाक्षरीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SURYAWANSHI
SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D7311256SDB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2025.10.11 00:01:47 +05'30'

**(संपत सुर्यवंशी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री(नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री(नियोजन व वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. सभापती विधान परिषद यांचे सचिव
६. मा. अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव
७. मा. उपसभापती विधान परिषद यांचे सचिव
८. मा. उपाध्यक्ष विधान सभा यांचे सचिव
९. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१०. सर्व मा. लोकसभा सदस्य/ राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
११. सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
१२. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. अपर मुख्य सचिव (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग), अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई

१८. अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. प्रधान सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
२१. प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई
२२. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. सचिव (प. दु. म.), कृषी व प. दु. म. विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. सचिव (मृद व जलसंधारण), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. सचिव (रोहयो), रोहयो विभाग, मंत्रालय, मुंबई
२६. सर्व विभागीय आयुक्त
२७. आयुक्त (कृषि) , कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२८. आयुक्त (जमाबंदी), जमाबंदी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२९. सर्व जिल्हाधिकारी
३०. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
३१. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
३२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
३३. सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, मुंबई
३४. महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक मदत-१, मदत-३
३५. निवडनस्ती (कार्यासन मदत-१)

| शा. नि., क्रमांक:- सीएलएस-२०२५ /प्र.क्र.३६५ /म-३ (मदत-१),दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२५ सोबतचे परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | अंशत: बाधित तालुके* | पूर्णत: बाधित तालुके | बाधित तालुक्यांची संख्या |
| १ | पालघर | - | पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड | ४ |
| २ | नाशिक | कळवण, देवळा, इगतपुरी | मालेगाव, निफाड,नांदगाव,सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला | १५ |
| ३ | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा | - | ३ |
| ४ | जळगांव | - | एरंडोल , पारोळा, धरणगाव ,पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर | १३ |
| ५ | अहिल्यानगर | पारनेर, संगमनेर, अकोले | अहिल्यानगर,शेवगाव, कर्जत,पाथर्डी, नेवासा , राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा ,कोपरगाव | १४ |
| ६ | पुणे | हवेली, इंदापूर | - | २ |
| ७ | सोलापूर | - | उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा , सांगोला | ११ |
| ८ | सांगली | कडेगाव | मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव , कवठेमहाकाळ, विटा, आटपाडी, जत | १० |
| ९ | सातारा | सातारा,कराड, पाटण, फलटण, जावळी | कोरेगाव, खटाव, माण | ८ |
| १० | कोल्हापूर | कागल ,शिरोळ, पन्हाळा | करवीर ,राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड | ८ |
| ११ | छ. संभाजीनगर | - | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री | ९ |
| १२ | जालना | - | बदनापूर ,घनसावंगी, अंबड , जालना ,परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद | ८ |
| १३ | बीड | - | बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई ,परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी | ११ |
| १४ | लातूर | - | लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर | १० |
| १५ | धाराशिव | - | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा | ८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | नांदेड | - | कंधार,किनवट, मुदखेड, भोकर, अर्धापूर, माहूर, नांदेड, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली,धर्माबाद, नायगाव ,हदगाव, हिमायतनगर, उमरी | १६ |
| १७ | परभणी | - | पूर्णा ,पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | ९ |
| १८ | हिंगोली | - | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव , वसमत | ५ |
| १९ | बुलढाणा | नांदूरा, संग्रामपुर | चिखली, सिंदखेडराजा , देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर,मलकापूर , जळगावजामोद | १३ |
| २० | अमरावती | - | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा , धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | १४ |
| २१ | अकोला | - | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी | ७ |
| २२ | वाशिम | - | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर , कारंजा, मानोरा | ६ |
| २३ | यवतमाळ | - | पुसद, यवतमाळ, बाभूळगाव, मारेगाव,महागाव, उमरखेड,कळंब,घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी , झरी -जामणी | १६ |
| २४ | वर्धा | - | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, कारंजा ,आष्टी | ८ |
| २५ | नागपूर | - | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा,उमरेड, कुही, नरखेड | १३ |
| २६ | भंडारा | - | साकोली, भंडारा,मोहाडी,तुमसर ,पवनी , लाखनी, लाखंदूर | ७ |
| २७ | गोंदिया | तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, मोरअर्जुनी, सालेकसा, सडक अर्जुनी, आमगाव | देवरी | ८ |
| २८ | चंद्रपूर | - | चंद्रपूर, भद्रावती, राजूरा , बल्लारपूर, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपुरी | १४ |
| २९ | गडचिरोली | चारमोशी, कोरची | गडचिरोली, धानोरा, मूलचेरा, आरमोरी, कुरखेडा, अहेरी, सिरोचा, भामरागड, एटापली, देसाइगंज (वडसा) | १२ |
| | **एकूण** | ३१ | २५१ | २८२ |

* अंशतः बाधित तालुक्यामध्ये प्रत्यक्ष बाधित मंडळ सवलतीस पात्र असतील.

SURYAWANSHI
SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2025.10.11 00:02:08 +05'30'